BY POST

# मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य यांचे कार्यालय

क्रमांक : ईएलआर-२०१३ / प्र.क्र.३९७ /१३ /३३
सामान्य प्रशासन विभाग
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय विस्तार, मुंबई — ४०० ०३२.
दिनांक : २९ जानेवारी, २०१४.

UNIVERSITY OF MUMBAI
IS/ICD/ECD/2014
07 FEB 2014
47134

Pl. Circulate to colleges.
Sneha
7/2/14.
p. A to R
R 7/2/14
PRO / Direct DSN

प्रति,

जिल्हाधिकारी व जिल्हा निवडणूक अधिकारी (सर्व).

DEPARTMENT OF STUDENTS' WELFARE UNIVERSITY OF MUMBAI
Inward No. 3671
11-02-14.

विषय : **प्रत्येक महाविद्यालयातील एका विद्यार्थ्यास कॅम्पस ॲम्बेसेडर (Campus Ambassador) म्हणून नियुक्त करण्याबाबत—**

संदर्भ : शासन निर्णय क्रमांक ईएलआर-२०१३/प्र.क्र.३९७/१३/३३, दिनांक ३१.०७.२०१३

**महोदय,**

भारत निवडणूक आयोगाने दिनांक २०.०९.२०१३ च्या पत्रान्वये महाविद्यालयीन कॅम्पस ॲम्बेसेडर (Campus Ambassador) नेमण्यासाठी मार्गदर्शक सूचना तसेच कॅम्पस ॲम्बेसेडर (Campus Ambassador) ची भूमिका व कर्तव्ये इत्यादी बाबी स्पष्ट केल्या आहेत (सुलभ संदर्भासाठी सदर पत्राची प्रत सोबत जोडली आहे). सदर पत्रात भारत निवडणूक आयोगाने दिलेल्या निदेशानुसार राज्यातील प्रत्येक महाविद्यालयातील एका विद्यार्थ्याची महाविद्यालयीन कॅम्पस ॲम्बेसेडर (Campus Ambassador) म्हणून नियुक्ती करण्याचे काम संबंधित महाविद्यालयाच्या प्राचार्यांनी शक्यतो दिनांक १५ फेब्रुवारी, २०१४ पर्यंत पूर्ण करावे. परंतु जे विद्यार्थी स्वेच्छेने हे काम करण्यास इच्छूक आहेत अशाच विद्यार्थी / विद्यार्थीनीची निवड करणे अपेक्षित आहे. विद्यार्थ्यांची महाविद्यालयीन कॅम्पस ॲम्बेसेडर (Campus Ambassador) म्हणून नेमणूक करताना तो कोणत्याही राजकीय पक्षाशी संबंधीत नसेल याची खात्री करून घ्यावी व अशा आशयाचे हमीपत्र त्या विद्यार्थ्याकडून प्राप्त करून घेणे आवश्यक आहे, तसेच त्या विद्यार्थ्याचे चारित्र्याबाबत जिल्हा प्रशासनामार्फत पोलीस अहवाल प्राप्त करून घ्यावा. विद्यार्थ्यांची महाविद्यालयीन कॅम्पस ॲम्बेसेडर (Campus Ambassador) म्हणून नेमणूक करताना मुलींना प्राधान्य देण्यात यावे. सदर विद्यार्थ्यांची नियुक्ती तुर्त एका वर्षासाठी करण्यात यावी.

महाविद्यालयातील युवकांमध्ये निवडणूकीच्या संदर्भात जागृती करणे तसेच महाविद्यालयात प्रवेश घेणाऱ्या व १८ वर्षे पूर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांचे नाव मतदान यादीत समाविष्ट करण्यासाठी आवश्यक ती मदत या महाविद्यालयीन कॅम्पस ॲम्बेसेडर (Campus Ambassador) यांनी करणे अपेक्षित आहे. याशिवाय भारत निवडणूक आयोगाकडून वेळोवेळी प्राप्त होणाऱ्या सूचनांच्या अनुषंगाने कार्यवाही करणे अपेक्षित आहे. जिल्ह्याची एकत्रित माहिती (महाविद्यालय निहाय कॅम्पस ॲम्बेसेडर (Campus Ambassador) च्या नावासह) या कार्यालयास दिनांक २५ फेब्रुवारी, २०१४ पर्यंत सादर करावी.